किरकोळ फौजदारी अर्ज क्र. १७९/२०२४
निशाणी १ खाली

## व्हेरिफिकेशन

नाव : संतोष रामचंद्र गुळवे
वय :४३ वर्षे, व्यवसायः शेती,
रा. तळेगांव दाभाडे, वतननगर, जि. पुणे

१. शपथेवर कथन करतो की, जुलै २०२३ मध्ये मी स्वीफ्ट डिझायर गाडी घेण्याचा विचार करत होतो. दरम्यानच्या काळात OLX या ऑनलाईन प्लॅट फॉर्मवर स्वीफ्ट डिझायर गाडी पाहिली. मी सदर व्यक्तीला मॅसेज केला असता त्या व्यक्तीने माझा नंबर मागविला व मला फोन केला. त्यांनी मला ते युग्मेश सोनार बोलत असल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी गाडी पाहण्यासाठी त्यांनी मला पुणे रेल्वे स्टेशन जवळ बोलाविले. त्याप्रमाणे मी तेथे गेलो. तेथे मी गाडी पाहिली व गाडीचे फोटो घेतले व तसेच गाडीचे कागदपत्रे पाहिले व त्यांना सांगितले की, तुम्ही तळेगांव दाभाडे येथे या आपण गाडीचा व्यवहार करु. त्यावेळी गाडीची किंमत रक्कम रु. ७,४३,०००/– इतकी ठरवली होती. त्यानंतर दोन दिवसांनी ते तळेगांव दाभाडे येथे आले. त्यानंतर माझा लहान भाऊ योगेश रामचंद्र गुळवे याच्या नावे वैयक्तिक कर्ज घेऊन रक्कम रु. ७,५०,०००/– ची व्यवस्था करुन ठेवली होती.

२. दि. २२ जुलै २०२३ रोजी युग्मेश सोनार हे माझ्याकडे गाडी घेवुन आले व आम्ही गाडी खरेदीबाबतचा करारनामा केला व दि.२३ जुलै २०२३ रोजी ॲड. सुरेंद्र दाभाडे यांच्याकडे तो करारनामा नोटराईज केला. त्यानंतर युग्मेश सोनार यांना माझ्या घरी बोलावुन माझ्या वडीलांच्या हातुन रोख रक्कम ४,००,०००/– व उर्वरीत रक्कम रु. ३,४३,०००/– चा कोटक बॅंकेचा धनादेश दिला. त्यानंतर त्यांनी गाडी माझ्या ताब्यात दिली व दोन ते तीन दिवसांनी गाडी तुमच्या नावावर करुन देतो असे सांगितले. त्यानंतर दोन दिवसांनी मला निगडी आर.टी.ओ. येथे बोलाविले. मी त्याप्रमाणे निगडी आर.टी.ओ. येथे गेलो तेथे त्यांनी एजन्टला फोन लावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांनी फोन लागत नाही असे सांगुन तुम्हाला मी केव्हा यायचे हे नंतर कळवितो असे सांगितले. त्यानंतर दि.२८/०७/२०२३ रोजी त्यांनी मला सकाळी ८ वाजताच्या दरम्यान फोन केला, व तुम्ही येरवडा आर.टी.ओ. जवळ या आपण गाडीचा व्यवहार पुर्ण करु असे सांगितले. तसेच त्यांनी माझ्या मोबाईलवर येरवडा आर.टी.ओ. येथे कोठे यायचे याचे लोकेशन पाठविले. त्याप्रमाणे मी माझ्या वडिलांना घेऊन दुपारी साधारण ११.४५ च्या दरम्यान येरवडा आर.टी. ओ. येथे पाहोचलो. तेथे पाहोचल्यानंतर वारंवार युग्मेश सोनार यांना फोन केला परंतु त्यांचा फोन स्वीचऑफ

Scanned with OKEN Scanner

येत होता. त्यादिवशी मी साधारण ४ वाजेपर्यंत वाट पाहिली. परंतु त्यांचा फोन लागला नाही. त्यानंतर दरम्यानच्या शनिवारी व रविवारी मी त्यांना फोन करण्याचा प्रयत्न करत होतो. परंतु त्यांना फोन लागला नाही. त्यानंतर आर.सी. वरील पत्त्यावर मी शहानीशा करण्यासाठी गेलो असता तेथे सिक्युरिटी गार्डकडे त्यांच्याबाबत चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, ते गावी गेले आहे व त्यांचे सकाळीच त्यांच्या सोबत बोलणे झालेले आहे. तेव्हा मी त्यांच्याकडे ज्या नंबर वर बोलणे झाले आहे तो नंबर मागितला. त्यानंतर मी त्या नंबर वर फोन करुन मी तुमच्या बरोबर गाडीचा व्यवहार केलेला आहे व तुम्ही माझा फोन घेत नाही, अशी विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, त्यांनी माझ्या सोबत गाडीचा व्यवहार केलेला नाही. त्यानंतर मी त्यांना व्हाटसअप व्हीडीओ कॉल करण्यास सांगितले. त्यांना व्हाटसअप कॉलवर पाहिले असता, सदरची व्यक्ती वेगळीच असल्याचे दिसले. परंतु त्यांनी त्यांचे नाव युग्मेश सोनार असे असल्याबाबत सांगितले. त्यानंतर मी त्यांना माझ्यासोबत ज्या व्यक्तीने गाडीचा व्यवहार केला होता, त्याचे डिटेल्स त्यांच्या व्हाटसअप वर पाठविले. सदरचे डिटेल्स पाहिल्यानंतर त्यांनी मला फोन केला व सांगितले की, त्या व्यकीचे नाव शशांक दारकोंडे असे असुन तो त्यांच्या गाडीवर ड्रायव्हर आहे. त्यामुळे मला जाणवले की, माझी फसवणुक झालेली आहे. त्याचप्रमाणे शशांक दारकोंडे याने युग्मेश सोनार याच्या आधार कार्डवर स्वतःचा फोटो लावुन खोटे आधारकार्ड बनवुन माझी फसवणुक केली आहे. त्यानंतर मुळ मालक युग्मेश सोनार यांनी मला सांगितले की, मी उद्या आल्यानंतर आपण शशांक दारकोंडे हे राहत असलेल्या घरी, लोहगांव येथे जाऊ या.

३. दि.०१ ऑगस्ट २०२३ रोजी मी, माझा भाऊ, माझा साडु व युग्मेश सोनार व त्यांचे मित्र अनिश चिपडे असे आम्ही लोहगांव येथे शशांक दारकोंडे यांची चौकशी केली. परंतु ते तेथे सापडले नाहीत. त्यानंतर युग्मेश सोनार मला म्हणाले की, आपण कोथरुड पो.स्टे. मध्ये जाऊन आपण तक्रार करु या. आम्ही तक्रार दिल्यानंतर पोलीसांनी आम्हाला शशांक दारकोंडे यांचे मोबाईल लोकेशन दिले. त्यावरुन ते वडगांव तळेगांव च्या दरम्यान असल्याचे दिसले. त्यानंतर मी, अनिश चिपडे व त्यांचे आणखी एक मित्र त्या लोकेशनवर आलो असता, शशांक दारकोंडे तेथे मिळून आला नाही. त्यानंतर पोलीसांनी पुन्हा शशांक दारकोंडे यांचे लोकेशन दिले ते लोहगांव येथील होते. त्या लोकेशनवर गेलो असता, रात्री साधारण १२.३० च्या दरम्यान शशांक दारकोंडे आम्हाला मिळून आला. त्यावेळी आम्ही सर्व जण बरोबर होते. त्यानंतर त्याला घेवुन आम्ही कोथरुड पो.स्टे. मध्ये आलो. त्यावेळी युग्मेश सोनार व अनिश चिपडे हे पोलीसांसोबत बोलत होते. त्यावेळी शशांक दारकोंडे हा माझा भाऊ व माझा साडु यांना म्हणाला की, तुम्ही दिलेले पैसे माझ्या अकाऊंट ला आहे मी तुम्हाला ते परत करेल. त्यानंतर युग्मेश सोनार यांनी शशांक दारकोंडे यांच्याकडुन रक्कम रु. २,५०,०००/- ऑनलाईन त्यांच्या अकाउंटवर ट्रॉन्सफर करुन घेतले. तसेच शशांक दारकोंडे यांच्या पत्नीच्या अकाऊंट वरुन रक्कम रु. ५०,०००/- युग्मेश सोनार यांनी ट्रॉन्सफर

Scanned with OKEN Scanner

करुन घेतले. त्यानंतर पोलीसांनी माझा जबाब वैगेरे नोंदवुन घेतला व आरोपी दहा दिवसात पैसे आणुन देईल असे सांगितले. त्यानंतर आरोपीला पोलीसांनी सोडुन दिले. त्यानंतर स्वीफ्ट डिझायर गाडी मुळ मालक युग्मेश सोनार यांच्याकडे परत दिले.

४. त्यानंतर मी सतत पोलीस स्टेशनला जात होता व माझ्या पैशासंबंधी चौकशी करत होतो. परंतु वारंवार त्यांनी आणखी काही दिवसाने पैसे देतो असे सांगितले. यामध्ये साधारण ६ महिने गेले. त्यानंतर कोथरुड पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी मला सांगितले की, तुमचा गाडीचा ज्या ठिकाणी व्यवहार झाला आहे तेथील तळेगांव दाभाडे पो.स्टे. मध्ये जाऊन तुम्ही तक्रार दाखल करा. त्यानंतर मी तळेगांव दाभाडे पो.स्टे. मध्ये तक्रार दाखल करण्यासाठी गेलो होतो. त्यादरम्यान सुध्दा युग्मेश सोनार व अनिल चिपडे हे तळेगांव दाभाडे पोलीसांच्या संपर्कात होते. तेथे माझी तक्रार दाखल झाली नाही. त्यामुळे मी माझ्या वकीलांमार्फत OLX ऑनलाईन प्लॅटफॉर्मला, शशांक दारकोंडे व युग्मेश सोनार यांना नोटीस पाठविली. शशांक दारकोंडे यांना नोटीस देण्यासाठी मी नागपुर येथील त्यांच्या पत्यावर गेलो. तेथे त्यांच्या पत्नीने त्यांचा नविन मोबाईल नंबर दिला. मी त्या नंबरवर सध्याची नोटीस पाठविली. त्यानंतर त्यांनी मला तुमचे पैसे देतो असे म्हणुन व्हाटसअपवर बरेच मॅसेज पाठविले. परंतु त्यांनी मला पैसे दिले नाही, त्यामुळे मी सदरची तक्रार दाखल केलेली आहे. सबब त्यांच्याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

**व्हेरिफिकेशन पूर्ण.**

(फिर्यादी)

**दि. ०२/०४/२०२५**

समक्ष

SAVITA APPASO MALI

Digitally signed by SAVITA APPASO MALI
Date: 2025.04.02 13:10:54 +05'30'

**(श्रीमती एस.ए.माळी)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी,**
**वडगाव, ता.मावळ, जि. पुणे.**

Scanned with OKEN Scanner